# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-३२१/२०२३

**अपिलार्थी, श्री.फारुक रफिक मुल्ला**
**आर.एम.हाऊस, पापडी**
**पापडी पोस्ट ऑफिस मागे**
**ता.वसई, जि.पालघर ४०१ २०७**

विरुध्द

जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (माध्य.)
जिल्हा परिषद पालघर, बोईसर रोड, कोळगाव
ता.जि.पालघर ४०१ ४०४

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पालघर, बोईसर रोड, कोळगाव
ता.जि.पालघर ४०१ ४०४

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २७.२.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २२.८.२०२२ | १२.१०.२०२२ | ९.११.२०२२ | --- |

अपिलार्थी यांनी दि.१.२.२०२३ रोजीच्या अर्जान्वये "दिर्घ कालावधी नंतरही माहिती न दिल्यामुळे." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २७.२.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग, माध्य. जिल्हा परिषद पालघर हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(पालघर जिल्हयातील सर्व खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षकांना वैयक्तिक मान्यता, पालघर शिक्षण माध्यमिक विभागातून मिळाली आहे त्यांची सर्व माहिती मिळणेबाबत.) "*

*"(दि.१.५.२०१२ ते दि.३०.६.२०१७ पर्यंत पालघर जिल्हयातील सर्व खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षकांना वैयक्तिक मान्यता पालघर शिक्षण माध्यमिक विभागातून मिळाली आहे. (१) शिक्षकांची नावे. (२) शैक्षणिक पात्रता. (३) शाळेचे नाव. (४) वैयक्तिक मान्यता दिनांक व इतर अशी सर्व माहितीची कागदपत्रे.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, त्यांच्याकडे या माहिती अर्जासंदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध नाही. प्रस्तुत प्रकरणी त्यांना पुढील तारीख देण्यात यावी अशी त्यांनी सुनावणी दरम्यान आयोगास विनंती केली. सबब, त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### <u>आदेश</u>

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२२.४.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२५

**अपिल क्रमांक : के.आर-३२१/२०२३**
**अपिलार्थी, श्री.फारुक रफिक मुल्ला**
**सुनावणी दिनांक २२.४.२०२५ (In continuation of order dt. २७.२.२०२५)**

**विवेचन**

सदर उभयपक्ष अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

या प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग, माध्य. जिल्हा परिषद पालघर यांनी असे निवेदन केले होते की, "*त्यांच्याकडे या माहिती अर्जासंदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध नाही. प्रस्तुत प्रकरणी त्यांना पुढील तारीख देण्यात यावी अशी त्यांनी सुनावणी दरम्यान आयोगास विनंती केली.*" त्यांच्या या विनंतीनुसार प्रकरण आज सुनावणीसाठी ठेवण्यात आले होते. आज जन माहिती अधिकारी यांनी दि.२२.४.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास असे कळविले आहे की, त्यांच्या छातीत दुखत असल्यामुळे ते आज सुनावणीस उपस्थित राहू शकत नाहीत. सबब, प्रस्तुत प्रकरण सुनावणीसाठी पुढील तारखेवर ठेवण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२०.५.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ एप्रिल, २०२५

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ

**अपिल क्रमांक : के.आर-३२१/२०२३**
**अपिलार्थी, श्री.फारुक रफिक मुल्ला**
**सुनावणी दिनांक २०.५.२०२५ (In continuation of order dt.२२.४.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

या प्रकरणी दि.२२.४.२०२५ रोजीच्या सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे पत्राद्वारे विनंती करून त्यांच्या छातीत दुखत असल्यामुळे पुढील तरीखेची विनंती केली होती. त्यानुसार आज सुनावणी घेण्यात आली. तथापि, आज ते कोणतीही पूर्वसूचना न देता सुनावणीस अनुपस्थित आहेत. यावरून जन माहिती अधिकारी यांना या अपिलासंदर्भात काही सांगावयाचे नाही असे दिसून येते. सबब, अपिलार्थी यांच्या दि.२२.८.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरून विहित मुदतीत अथवा त्यानंतरही माहिती दिली नसल्यामुळे माहिती मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीस आयागोकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांनी **अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २२.८.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर

देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.१.७.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

**३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१.७.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २० मे, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर, बोईसर रोड, कोळगाव, ता.जि.पालघर ४०१ ४०४.

**अपिल क्रमांक : के.आर-३२१/२०२३**

**अपिलार्थी, श्री.फारुक रफिक मुल्ला**

**सुनावणी दिनांक १.७.२०२५ (In continuation of order dt.२०.५.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर जिल्हा परिषद पालघर यांनी दि.१.७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास त्यांचा लेखी खुलासा सादर केला. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी अर्ज सादर केला त्यावेळी ते तत्कालीन जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत नव्हते. तर श्रीम. हेलन लोपीस (सेवानिवृत्त), वरिष्ठ लिपिक या जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. त्यांनी अपिलार्थी यांचा अर्ज दि.१२.१०.२०२२ रोजीच्या पत्रानुसार मुख्याध्यापक (सर्व), खाजगी अनुदानित माध्यमिक शाळा यांना हस्तांतर केला होता.

वास्तविक खाजगी अनुदानित माध्यमिक शाळेतील शिक्षकांना मान्यता ही शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या स्तरावरून देण्यात येते. त्यामुळे ही माहिती त्यांच्या स्तरावर उपलब्ध असते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा अर्ज संबंधित शाळांना हस्तांतर करणे अपेक्षित नव्हते. परिणामी, अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास विलंब झाला आहे असे दिसून येते.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांनीसुध्दा अद्यापपर्यंत अपिलार्थींना माहिती दिली नाही. माहिती तयार असून ती तातडीने अपिलार्थींना देऊ असे त्यांनी तोंडी निवेदन केले. तथापि, आयोगाने दि.२०.५.२०२५ रोजी अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाने माहिती विनामूल्य देणेबाबत आदेश पारित केले असतानादेखील विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिली नाही असे दिसून येते.

आयोगाच्या दि.२०.५.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.२ अन्वये तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी म्हणून श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. तथापि, सदर कालावधीत ते तत्कालीन जन माहिती अधिकारी नसल्याने त्यांना दि.२०.५.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र. २ अन्वये देण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस मागे घेणे उचित होईल.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. हेलन लोपीस, वरीष्ठ लिपिक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या अर्जात मागितलेली माहिती शिक्षणाधिकारी, माध्यमिक यांच्या कार्यालयात उपलब्ध असताना सदरचा अर्ज मुख्याध्यापक (सर्व), खाजगी अनुदानित माध्यमिक शाळा, जि.पालघर यांच्याकडे वर्ग केल्याने अपिलार्थी यांना

माहिती मिळण्यास विलंब झाला. सबब, अपिलार्थींना माहिती मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. हेलन लोपीस, वरीष्ठ लिपिक,(सेवानिवृत्त), शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. हेलन लोपीस, वरीष्ठ लिपिक, (सेवानिवृत्त), शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांनी आयागोकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. हेलन लोपीस, वरीष्ठ लिपिक,(सेवानिवृत्त), शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर या सेवानिवृत्त झाल्या असल्याने विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांनी सदर सुनावणीची नोटीस त्यांचेवर बजावणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांनी आयोगाच्या दि.२०.५.२०२५ रोजीच्या आदेशानंतर अद्याप अपिलार्थींना माहिती दिलेली नाही. सबब, अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांचेवरदेखील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांनीदेखील आयागोकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. आयोगाच्या दि.२०.५.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.२ अन्वये तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी म्हणून श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. तथापि, सदर कालावधीत ते तत्कालीन जन माहिती अधिकारी नसल्याने त्यांना दि.२०.५.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र. २ अन्वये देण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस मागे घेण्यात येत आहे. प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. हेलन लोपीस, वरीष्ठ लिपिक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २२.८.२०२२ रोजीच्या अर्जात मागितलेली माहिती शिक्षणाधिकारी, माध्यमिक यांच्या कार्यालयात उपलब्ध असताना सदरचा अर्ज मुख्याध्यापक (सर्व), खाजगी अनुदानित माध्यमिक शाळा, जि.पालघर यांच्याकडे वर्ग केल्याने अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास विलंब झाला. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.९.९.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. हेलन लोपीस, वरीष्ठ लिपिक,(सेवानिवृत्त), शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर या सेवानिवृत्त झाल्या असल्याने विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांनी सदर सुनावणीची नोटीस त्यांचेवर बजावावी.**

३. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांनी आयोगाच्या दि.२०.५.२०२५ रोजीच्या आदेशानंतर अद्याप अपिलार्थींना माहिती दिलेली नाही. सबब,अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास विलंब झाला. म्हणून त्यांचेवरदेखील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.९.९.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

४. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.९.९.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १ जुलै, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. हेलन लोपीस, वरीष्ठ लिपिक,
शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर, बोईसर रोड, कोळगाव
ता.जि.पालघर ४०१ ४०४.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक,
शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर, बोईसर रोड, कोळगाव
ता.जि.पालघर ४०१ ४०४.

**अपिल क्रमांक : के.आर-३२१/२०२३**

**अपिलार्थी, श्री.फारुक रफिक मुल्ला**

**सुनावणी दिनांक ९.९.२०२५ (In continuation of order dt.१.७.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

या प्रकरणी उभयपक्ष अनुपिस्थत असल्याने त्यांना पुन्हा सुनावणीची नोटीस काढणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२८.१०.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ९ सप्टेंबर, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. हेलन लोपीस, वरीष्ठ लिपिक,
शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर, बोईसर रोड, कोळगाव, ता.जि.पालघर ४०१ ४०४.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक,
शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर, बोईसर रोड, कोळगाव, ता.जि.पालघर ४०१ ४०४.

**अपिल क्रमांक : के.आर-३२१/२०२३**

**अपिलार्थी, श्री.फारुक रफिक मुल्ला**

**सुनावणी दिनांक २८.१०.२०२५ (In continuation of order dt.९.९.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

या प्रकरणी अपिलार्थी, श्री.फारुक रफिक मुल्ला यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. तथापि, आयोगाच्या दि.१.७.२०२५ रोजीच्या आदेशानुसार (१) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. हेलन लोपीस, वरीष्ठ लिपिक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर आणि (२) विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी,

प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांचा लेखी खुलासा मागविण्यात आला होता. तथापि, ते दोघेही आजच्या सुनावणीस त्यांना सुनावणीची सूचना प्राप्त होऊनही अनुपस्थित आहेत. सबब, त्यांना या संदर्भात कोणताही समर्थनीय लेखी खुलासा सादर करावयाचा नाही असे स्पष्ट होते. सबब, अपिलार्थी यांना माहिती देण्यास झालेल्या विलंबासाठी (१) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. हेलन लोपीस, वरीष्ठ लिपिक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांचेवर शास्तीची कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे.

त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांनीही आयोगाच्या दि.२०.५.२०२५ रोजीच्या आदेशानंतर अद्याप अपिलार्थींना माहिती दिलेली नाही तसेच अपिलार्थीस आयोगाच्या आदेशानंतर माहिती दिली असल्याबाबतचा कोणताही समर्थनीय लेखी खुलासा त्यांनी सादर केला नाही. यास्तव त्यांचेवरदेखील शास्तीची कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे.

तसेच अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२२.८.२०२२ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना अद्यापपर्यंत मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नाही तसेच या संदर्भात आयोगाने दि.२०.५.२०२५ रोजी आदेश पारित केल्यानंतर देखील अपिलार्थी यांना अद्याप माहिती देण्यात आली नाही ही बाब पाहता अपिलार्थी यांना माहिती देण्यासंदर्भात विलंब का झाला तसेच या संदर्भात काय कार्यवाही करण्यात येणार आहे याबाबतचे शपथपत्र शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, पालघर यांनी पुढील सुनावणीस आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. हेलन लोपीस, (सेवानिवृत्त), वरीष्ठ लिपिक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर, यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २२.८.२०२२ रोजीच्या अर्जात मागितलेली माहिती शिक्षणाधिकारी, माध्यमिक यांच्या कार्यालयात उपलब्ध असताना सदरचा अर्ज मुख्याध्यापक (सर्व), खाजगी अनुदानित माध्यमिक शाळा, जि.पालघर यांच्याकडे वर्ग केल्याने अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल अद्यापपर्यंत कोणताही समर्थनीय लेखी खुलासा आयोगास सादर केला नसल्याने त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये रु.२५,०००/- (अक्षरी रु. पंचवीस हजर रुपये फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचेकडून १० मासिक हप्त्यात वसूल करुन राष्ट्रीयकृत बँकेत **किंवा** कोषागार कार्यालयात लेखाशीर्ष क्र. ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली चलन भरून रोखीने **किंवा** धनादेशाव्दारे जमा करावी. या बाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल **शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद पालघर** यांनी आयोगास सादर करावा.

२. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर यांनीही आयोगाच्या दि.२०.५.२०२५ रोजीच्या आदेशानंतर अद्याप अपिलार्थींना माहिती दिलेली नाही तसेच अपिलार्थीस आयोगाच्या आदेशानंतर माहिती दिली असल्याबाबतचा कोणताही समर्थनीय लेखी खुलासा त्यांनी सादर केला नाही. यास्तव त्यांचेवरदेखीलमाहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये रु.२५,०००/- (अक्षरी रु. पंचवीस हजर रुपये फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून ०५ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र.००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थ संकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करावी. याबाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद पालघर यांनी आयोगास सादर करावा.

**३. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२२.८.२०२२ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना अद्यापपर्यंत मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नाही तसेच या संदर्भात आयोगाने दि.२०.५.२०२५ रोजी आदेश पारित केल्यानंतर देखील अपिलार्थी यांना अद्याप माहिती देण्यात आली नाही ही बाब पाहता अपिलार्थी यांना माहिती देण्यासंदर्भात विलंब का झाला तसेच या संदर्भात काय कार्यवाही करण्यात येणार आहे याबाबतचे शपथपत्र शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, पालघर यांनी आयोगाकडे दि.४.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावे.**

४. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.४.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २८ ऑक्टोबर, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई यांचे कार्यालय, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र. ५२७/५२८, कोंकण भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
३. शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद पालघर, बोईसर रोड, कोळगाव, ता.जि.पालघर ४०१ ४०४
४. आहरण व संवितरण अधिकारी/मुख्य लेखा व वित्त अधिकारी, लेखा विभाग, शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद पालघर, बोईसर रोड, कोळगाव, ता.जि.पालघर ४०१ ४०४
५. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. हेलन लोपीस, (सेवानिवृत्त) वरीष्ठ लिपिक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर, बोईसर रोड, कोळगाव, ता.जि.पालघर ४०१ ४०४.
६. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर, बोईसर रोड, कोळगाव, ता.जि.पालघर ४०१ ४०४.

राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ

**अपिल क्रमांक : के.आर-३२१/२०२३**

**अपिलार्थी, श्री.फारुक रफिक मुल्ला**

**सुनावणी दिनांक ४.१२.२०२५ (In continuation of order dt.२८.१०.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही.

आयोगाच्या दि.२८.१०.२०२५ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना अद्याप माहिती देण्यात आली नाही ही बाब पाहता अपिलार्थी यांना माहिती देण्यासंदर्भात विलंब का झाला तसेच या संदर्भात काय कार्यवाही करण्यात येणार आहे याबाबतचे शपथपत्र शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, पालघर यांनी आजरोजी आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणेबाबत आदेशित करण्यात आले होते. परंतु, आजच्या सुनावणीची सूचना प्राप्त होऊनदेखील शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, पालघर हे अनुपस्थित आहेत. तसेच त्यांनी आयोगास त्यांच्या अनुपस्थितीबाबत काहीही कळविलेले नाही.

अपिलार्थी यांना अद्याप माहिती देण्यात न आल्यामुळे तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी अशा दोन्हीही जन माहिती अधिका-यांवर रू. २५,०००/- इतकी शास्ती आयोगाने लादली आहे. तरीदेखील अपिलार्थी यांना अद्याप माहिती प्राप्त झाली नाही ही गंभीर बाब असल्यामुळे शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, पालघर यांनी आजरोजी आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून शपथपत्र सादर करणे अपेक्षित होते. तथापि, **शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, पालघर यांची साक्ष या ठिकाणी अतिशय महत्वाची आहे. परंतु, ते अनुपस्थित असल्यामुळे त्यांच्या उपस्थितीची खात्री करण्यासाठी त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ (३) (क) नुसार व सिव्हील प्रोसिजर कोड (CPC) नुसार समन्स बजावणे उचित होईल. सदर समन्सची बजावणी संबंधित वरीष्ठ पोलीस निरिक्षक, पालघर यांचेमार्फत करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.**

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.३.२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ डिसेंबर, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. **शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद पालघर, बोईसर रोड, कोळगाव, ता.जि.पालघर ४०१ ४०४**

२. **वरीष्ठ पोलीस निरिक्षक, पालघर, पालघर पोलीस ठाणे, तहसिल कार्यालयाजवळ, विष्णू नगर, पालघर, ता. जि. पालघर ४०१ ४०४.**

**अपिल क्रमांक : के.आर-३२१/२०२३**

**अपिलार्थी, श्री.फारुक रफिक मुल्ला**

**सुनावणी दिनांक ३.२.२०२६ (In continuation of order dt.४.१२.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद पालघर हे अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

या प्रकरणी दि.४.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद पालघर यांना आजरोजी आयोगासमोर शपथपत्र सादर करणेकामी सुनावणीसाठी स्वत: उपस्थित राहणेबाबत समन्स बजावण्यात आले होते. तथापि, ते आजच्या सुनावणीसही अनुपस्थित असल्याने त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ (३) (क) नुसार व सिव्हील प्रोसिजर कोड (CPC) नुसार पुन्हा समन्स बजावणे उचित होईल. सदर समन्सची बजावणी संबंधित वरीष्ठ पोलीस निरिक्षक, पालघर यांचेमार्फत करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.७.४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३ फेब्रुवारी, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. **शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद पालघर, बोईसर रोड, कोळगाव, ता.जि.पालघर ४०१ ४०४**

२. **वरीष्ठ पोलीस निरिक्षक, पालघर, पालघर पोलीस ठाणे, तहसिल कार्यालयाजवळ, विष्णू नगर, पालघर, ता. जि. पालघर ४०१ ४०४.**

**अपिल क्रमांक : के.आर-३२१/२०२३**

**अपिलार्थी, श्री.फारुक रफिक मुल्ला**

**सुनावणी दिनांक ७.४.२०२६ (In continuation of order dt.३.२.२०२६)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. हेलन लोपीस, सेवानिवृत्त, वरीष्ठ लिपिक, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय एस.गोवारी, प्र. अधिक्षक आणि विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. एम. बी. मते, प्र. उपशिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी श्री. एम. बी. मते, प्र. उपशिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्य.), जिल्हा परिषद पालघर हे शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद पालघर यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित आहेत. श्री. अशोक पाटील, शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद पालघर यांनी त्यांच्या अनुपस्थितीबाबत आयोगास काहीही कळविलेले नाही. सबब, प्रस्तुत प्रकरण श्री. अशोक पाटील, शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद पालघर यांचेसाठी सुनावणीकरीता ठेवण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१६.४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ७ एप्रिल, २०२६

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ